## नीरीला भेट, डॉ. क्रिष्णा खैरनार यांचे अभिनंदन

# फडणवीसांनी जाणून घेतली 'सलाईन गार्गल आरटीपीसीआर टेस्ट'ची माहिती

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**नागपूर :** राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (नीरी) विकसित केलेल्या 'सलाईन गार्गल आरटीपीसीआर टेस्ट' तंत्रज्ञानाचा वापर आता पूर्व अफ्रिका, व्हिएतनाम यासारख्या देशांमध्ये सुरू झाला आहे. हे तंत्रज्ञान विकसित करणारे नीरीच्या पर्यावरण विषाणू कक्षाचे प्रमुख डॉ. क्रिष्णा खैरनार यांची विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले.

डॉ. क्रिष्णा खैरनार यांनी विकसित केलेले 'सलाईन गार्गल आरटीपीसीआर टेस्ट' हे संच आता जागतिक पातळीवर पोहोचले आहे. भारतीय औषध महानियंत्रक संस्थेच्या (डीसीजीआय) परवानगीनंतर या तंत्रज्ञानाचे उत्पादन सुरू झाले आहे.



डॉ. खैरनार यांच्याकडून तंत्रज्ञान जाणून घेताना देवेंद्र फडणवीस.

पूर्व अफ्रि का, व्हिएतनाम यासारख्या आर्थिकदृष्ट्या कमकुवत राष्ट्रांना करोना चाचणीसाठी मोजावी लागणारी किंमत परवडणारी नाही. मात्र, कमी पैशात चाचणीसह कमी वेळात परिणाम मिळत असल्याने हे तंत्रज्ञान या राष्ट्रांनी स्वीकारले आहे. डॉ. खैरनार यांच्या भेटीत फडणवीस यांनी हे तंत्रज्ञान जाणून घेत त्यांचे अभिनंदन केले. सध्यातरी हे चाचणी संच भारतातच असून भारतीय निर्मात्यांकडूनच ते मिळणार आहे. भारतात व्यावसायिक स्तरावर त्याचे उत्पादन सुरू झाले आहे. नागपूर महापालिका, जिल्हा परिषद आणि चार खासगी प्रयोगशाळांनी हे तंत्रज्ञान अपाधीच स्वीकारले आहे. विशेष म्हणजे, ही चाचणी करण्यासाठी कुशल तंत्रज्ञाची गरज नाही. तत्कालीन केंद्रीय मंत्री हर्षवर्धन यांनी य तंत्रज्ञानाचे 'गेमचेंजर' या शब्दा कौतुक केले.

### 'बदलत्या काळात स्वयंरोजगाराची कास धरावी लागेल'

स्पर्धेच्या युगात आता साधी शिपायाची नोकरी मिळणे अवघड होणार आहे, कारण बदलत्या रचनेत पुढच्या काळात शिपायाची गरजच भासणार नाही, त्यामुळे जास्तीत जास्त लोकांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातूनच रोजगार उपलब्ध करून द्या, असे आवाहन विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केले. केंद्रीय लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय, खादी ग्रामोद्योग महामंडळाच्यावतीने येथील शिक्षक सहकारी बँकेत पंतप्रधान स्वयंरोजगार योजनेच्या जनजागृती शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. खादी व ग्रामोद्योग आयोगाचे केंद्रीय सदस्य जयप्रकाश गुप्ता, महापौर दयाशंकर तिवारी, आ. कृष्णा खोपडे, आ. अनिल सोले, आ. विकास कुंभारे यांच्यासह इतर मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी काही अपरिहार्य कारणामुळे या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाही. यावेळी खादी ग्रामोद्योग महामंडळाच्या योजनांच्या लाभार्थी संस्थांचा सत्कार करण्यात आला.